जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 MAR 2018
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात दीक्षांत सोहळ्याची जय्यत तयारी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभ सोमवार १९ मार्च रोजी होणार आहे. विद्यापीठ प्रशासनाने तारीख निश्चित केली असली तरी अद्याप अधिकृत घोषणा केलेली नाही. या समारंभासाठी इस्रोचे माजी अध्यक्ष ए. एस. किरणकुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, ही माहिती विद्यापीठाच्या अधिकृत सूत्रांनी दिली.

यंदा शिवाजी विद्यापीठातर्फे ५० हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली जाणार आहे. यामध्ये २३ हजार ३०० विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पदवी प्रदान केली जाणार आहे. तर २६ हजार ७०० विद्यार्थ्यांना घरपोच पदवी प्रमाणपत्रे पाठविली जाणार आहेत. तसेच पीएच.डी. पदवी पैकी फॅकल्टी ऑफ आर्ट अँन्ड फायनल आर्ट, सोशल सायन्स, विज्ञान विभाग, आदी

- सोमवार १९ मार्चला दीक्षांत समारंभ
- इस्रोचे माजी अध्यक्ष ए. एस. किरणकुमार प्रमुख पाहुणे

विभागातील जवळपास ५० स्नातकांना पदवी प्रमाणपत्र व्यासपीठावर प्रदान केली जाणार आहेत. परीक्षा व मूल्यमापन समितीचे संचालक महेश काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा विभागात दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी सुरू आहे. पदवी प्रमाणपत्र छपाईचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे.

**सोहळ्याची माहिती ऑनलाईन मिळणार**

दीक्षांत समारंभाचे संपूर्ण कामकाज ऑनलाईन होणार आहे.

पान ४ पहा

# शिवाजी विद्यापीठात दीक्षांत सोहळ्याची जय्यत तयारी

पान १ वरुन

यामध्ये स्नातकांना दीक्षांत समारंभाची सविस्तर माहिती ई-मेल व एसएमएसव्दारे दिली जाणार आहे.

तसेच यावर्षी पदवी प्रमाणपत्रात चूक असल्यास पुन्हा प्रमाणपत्रासाठी अर्ज करणे अनिवार्य आहे. हा अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांना विद्यापीठात फेऱ्या माराव्या लागणार नाहीत. तसेच कोणत्या स्टॉलवर पदवी प्रमाणपत्र मिळणार याची माहिती एसएमएसव्दारे कळवली जाणार आहे. तसेच दीक्षांत समारंभाचे थेट प्रक्षेपण सोशल मिडीयावर केले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 MAR 2018
सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत सोहळा १९ ला

## 'इस्त्रो'चे माजी अध्यक्ष ए. एस. किरणकुमार प्रमुख पाहुणे

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभ १९ मार्चला ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि 'इस्त्रो'चे माजी अध्यक्ष ए. एस. किरणकुमार यांच्या उपस्थितीत होणार आहे. समारंभात एकूण ५० हजार २४३ पदवी प्रमाणपत्रांचे वाटप केले जाईल. त्यापैकी २४ हजार पदवी प्रमाणपत्र या दीक्षांत समारंभाच्या ठिकाणी आणि इतर २६ हजार पदव्यांचे टपालाद्वारे वाटप केले जाणार आहे.

अनेक दिवसांपासून दीक्षांत समारंभाची तारीख निश्चित होत नव्हती. त्यास अखेर १९ मार्चचा मुहूर्त मिळाला. त्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशासनाने समारंभाची तयारी सुरू केली आहे. निमंत्रण पत्रिकेपासून स्टॉल उभारणीच्या कामाचे नियोजन सुरू झाले आहे. त्याबाबतची पूर्वतयारीचीही बैठक झाली. या समारंभासाठी पदवी व पदविका प्रमाणपत्र मागणीसाठीचे अर्ज ऑनलाईन मागविण्यात आले. त्यात ५० हजार २४३ अर्ज विद्यापीठाकडे दाखल झाले आहेत.



### दृष्टिक्षेपात

- ५४ वा दीक्षांत सोहळा
- ५० हजार २४३ पदवीधर
- प्रशासनाची जय्यत तयारी

त्यातील २४ हजार विद्यार्थी हे प्रत्यक्ष कार्यक्रमावेळी पदवी घेण्यास येणार आहेत. त्यांना कोणत्या स्टॉलवर पदवी मिळेल, याबाबतची इत्यंभूत माहिती विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे अगर ई-मेलद्वारे दिली आहे. तसेच, या दीक्षांत समारंभाचे थेट प्रक्षेपण विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सोशल मीडियाच्या आधारे करण्याचीही तयारी सुरू झाली आहे.

7 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वप्ने मोठी बघा; त्याला पर्याय ठेवूच नका...!

## अमोल यादव, संदीप पाटील यांनी जागवल्या नवचेतना

सकाळ वृत्तसेवा

संवाद ध्येयवेड्यांशी ऊर्जा

कोल्हापूर, ता. ६ : जे काही स्वप्न बघायचे आहे, ते नेहमी मोठं बघा. मात्र त्याला दुसरा कुठलाही पर्याय अजिबात ठेवू नका. झपाटून कामाला लागा. सुरुवातीला अपयश आले तरी खचू नका. नेमके काय चुकते, याची उजळणी करा आणि पुन्हा यशोशिखर सर करण्यासाठी सज्ज व्हा. यशाचे शिखर नक्कीच तुम्ही पार कराल... भारतीय बनावटीचे पहिले विमान तयार करणारे कॅप्टन अमोल यादव आणि साताऱ्याचे कर्तव्यदक्ष पोलिस अधीक्षक संदीप पाटील यांनी अशा नवचेतना आज साऱ्यांच्या नसानसांत जागवल्या.

निमित्त होते, सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठ आयोजित फिझिंगा - संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' या उपक्रमाचे. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात हाऊसफुल्ल गर्दीच्या साक्षीने आज या संवाद मालिकेची सांगता झाली. टाळ्यांचा कडकडाट

पान ८ वर »



कोल्हापूर : सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठ आयोजित फिझिंगा - संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' उपक्रमाचा मंगळवारी समारोप झाला. त्यावेळी कॅप्टन अमोल यादव आणि साताऱ्याचे पोलिस अधीक्षक संदीप पाटील यांचा संवाद अनुभवण्यासाठी हाऊसफुल्ल गर्दीने भरलेले लोककला केंद्र. ( बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा )

## अकार्यक्षम 'डीजीसीए' अन् कोल्हापूरचे विमानतळ

भारताच्या स्वातंत्र्यानंतर नागरी विमान चालन (डीजीसीए) संचालनालयाचा कारभार अकार्यक्षम राहिला, असे सांगून कॅप्टन अमोल यादव म्हणाले, "स्वातंत्र्याच्या काळापासून भारतात सुमारे चारशे आणि महाराष्ट्रात तीसहून अधिक विमानतळे आहेत. मात्र आजही महाराष्ट्रात केवळ चार विमानतळावरूनच उड्डाण होते. हे सारे चित्र आहे ते केवळ चार डोक्यांनी निर्णय घेणाऱ्या 'डीजीसीए'मुळे. विमान तयार केल्यानंतर 'डीजीसीए'कडे रजिस्ट्रेशनसाठी नोंदणी केल्यानंतर टाळाटाळ झाली. 'मेक इन इंडिया'मध्ये विमान लक्षवेधी ठरल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदेश देऊनही कार्यवाही झाली नाही. अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी मुख्यमंत्र्यांनी पत्रव्यवहार केला.

पान ८ वर »

17 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वप्ने मोठी बघा ; त्याला पर्याय ठेवूच नका...!

» पान १ वरून

आणि स्टँडिंग ओव्हेशनने या दोन्ही शिलेदारांचे जोरदार स्वागत झाले. दरम्यान, 'सकाळ'चे कार्यकारी संपादक मनोज साळुंखे, जाहिरात हेड (आरओएम) उमेश पिंगळे, उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर, शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर, अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे विजयसिंह माने यांच्या हस्ते त्यांचे स्वागत झाले. मिलिंद कुलकर्णी (पुणे) यांनी श्री. यादव यांच्याशी तर 'साम-कोल्हापूर'चे ब्युरो संभाजी थोरात यांनी श्री. पाटील यांच्याशी संवाद साधला.

अमोल यादव यांचे एकत्रित म्हणजे १९ जणांचे कुटुंब. कुटुंब आणि मित्रांच्या पाठबळावरच भारतीय बनावटीच्या विमानाचे स्वप्न पूर्ण करता आल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. ते म्हणाले, "अमेरिकेत वैमानिकाचे प्रशिक्षण घेत असताना वयाच्या एकोणिसाव्या वर्षी स्वतःचे विमान घेतले. मात्र भारतात परतल्यानंतर आठ वर्षे नोकरी मिळाली नाही आणि त्या दरम्यान भारतीय बनावटीचे विमान अद्यापही उपलब्ध नसल्याची धक्कादायक माहिती मिळाली. त्यावेळी विमान तयार करण्याचा संकल्प केला आणि कामाला लागलो. पहिल्या दोन प्रयत्नांना अपयश आले. तरीही मनुष्यबळ, मटेरियल आणि आर्थिक बळ या तिन्ही गोष्टी उपलब्ध नसताना प्रयत्न सुरूच होते. तिसरा प्रयत्न २००९ ला सुरू केला आणि २०१६ ला सर्व चाचण्या यशस्वी झाल्या. मात्र भारतीय प्रशासनाने अनेक अडचणी निर्माण केल्या. त्यावरही मात करत आता महिन्याभरात या विमानाचे अधिकृत उड्डाण होईल."

संदीप पाटीलसुद्धा येलूर (ता. वाळवा) गावचे. गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे त्यांचे खूप मोठे काम. त्यांच्या या एकूण प्रवासाचे विविध पदर त्यांनी उलगडले. ते म्हणाले, "नक्षलवाद म्हणजे गरिबांसाठीची नव्हे तर सत्तेची लढाई आणि ती बंदुकीच्या नळीतून जाते. गडचिरोली पोलिस अधीक्षक म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर तत्पूर्वीचा इतिहास पहाता सर्वाधिक पोलिस नक्षलवाद्यांच्या बॉम्बस्फोटात शहीद होतात, हे लक्षात आले. पोलिस ठाणी सुमारे साठ आणि बॉम्ब डिस्पोजेबल इक्विपमेंटस् फक्त दोन पोलिस ठाण्यांत होती. तत्काळ सर्व पोलिस ठाण्यांत ही इक्विपमेंटस् उपलब्ध केली आणि पाचशे पोलिसांना त्याचे प्रशिक्षण दिले. सर्वात मोठे आव्हान होते, विधानसभा निवडणूक यशस्वी करण्याचे. उपलब्ध आठ हजार आणि अतिरिक्त आठ हजार अशा १६ हजार पोलिसांच्या चोख बंदोबस्तात ही निवडणूक यशस्वी करून दाखवली. या निवडणुकीत एकाही पोलिसाचा बळी गेला नाही. तत्पूर्वीच्या निवडणुकीत मात्र पोलिसांचे बळी ठरलेले असायचे. सरकारची आत्मसमर्पण योजना प्रभावीपणे राबवली आणि दोन वर्षांच्या काळात तब्बल एकशे पाच नक्षलवाद्यांचे पुनर्वसन केले."

### कोल्हापूरचे कठोर परिश्रम

इथल्या मातीत कठोर परिश्रम करण्याची ऊर्मी असून तिला योग्य नियोजन आणि सातत्याची जोड दिली तर कुठलाही गोष्ट अशक्य नाही, असे संदीप पाटील यांनी सांगितले. ते म्हणाले, "एमपीएससी'पेक्षा आता येथील तरुणांनी 'यूपीएससी'कडे वळायला हवे. मात्र हे आव्हान स्वीकारताना ॲकॅडमिक पातळीवरही गुणवत्ता महत्त्वाची आहे. कॉलेज, विद्यापीठात आपण जेव्हा पहिल्या पाच-दहा गुणवत्ता यादीत असून तेव्हा आपल्याला राज्यात, देशात प[हिल्या] शंभरात स्थान मिळेल."

## आत्मसमर्पण अन् असे बदलले नक्षलवादी



संदीप पाटील

नक्षलवाद्यांशी आणि स्थानिक नागरिकांशी संवादातून नक्षलवाद संपवता येणे शक्य असल्याचे स्पष्ट मत संदीप पाटील यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, "बॉम्ब डिस्पोजेबल इक्विपमेंटस्मुळे नक्षलवाद्यांचे हल्ले परतवणे शक्य झाले. मात्र नक्षलवाद संपवण्यासाठी त्यांची मानसिकता बदलावी लागते. सुरुवातीला त्यांच्या कमांडरनाच गाठले आणि संवादाची प्रक्रिया सुरू केली. गोपी आणि आयतू यांनी आत्मसमर्पण केल्यानंतर मग आत्मसमर्पण करणाऱ्यांची संख्या वाढली. आत्मसमर्पण केलेल्या एकशे पाच जणांमध्ये सोळा दाम्पत्ये आहेत. त्यांचे विवाह करून दिले आणि पुनर्वसन केले." लोकांशी संवाद वाढवण्यासाठी पोलिस ठाण्यात ग्रंथालयांची निर्मिती केली. पहिल्या चार महिन्यांतच दहा हजार पुस्तके जमा झाली. लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी ग्रंथालयांचा खूप मोठा फायदा झाला, असे त्यांनी सांगितले.

## मराठी पोलिसांचे सहकार्य



कॅप्टन अमोल यादव

अमोल यादव सांगतात, "मेक इन इंडिया'मध्ये विमान प्रदर्शित करण्यासाठी अधिकृत प्रवेश दिला गेला नाही. तेथेही अपमान झाला. मात्र, महाराष्ट्र पोलिसांनी विमान आत नेण्यासाठी सहकार्य केले. पासेस मागायला गेल्यानंतर आम्ही आत नियमबाह्य आल्याचे लक्षात आल्यानंतर भावाला पोलिसांना अटक करावी लागली. मात्र दरम्यान टीव्हीवरून भारतीय बनावटीचे पहिले विमान येथे असल्याच्या बातम्या प्रसारित होऊ लागल्या आणि मग पोलिसांनी चारऐवजी चाळीस पासेस दिले. पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांनी विमानाचे कौतुक केले. पुढे विमान ठेवायला जागा नसल्याची बातमी झळकली आणि मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने धुळे विमानतळावर विमान ठेवण्यासाठी जागा उपलब्ध झाली."

## शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य

- 'ऊर्जा - संवाद ध्येयवेड्यांशी' या उपक्रमाला गेली चार वर्षे शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य मिळाले आहे.
- उपक्रमांतर्गत संवादांचे फेसबुकवरून लाईव्ह प्रसारण झाले. हे संवाद अनुभवण्यासाठी लिंक करा-www.facebook.com/kolhapursakal

## प्रायोजकांविषयी...

- सहप्रायोजक : चाटे शिक्षणसमूह, मार्व्हलस इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, तनिष्क ज्वेलर्स,
- अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स, श्री ट्रॅव्हल्स
- हॉस्पिटॅलिटी पार्टनर : हॉटेल सयाजी
- रेडिओ पार्टनर : रेडिओ सिटी

…ापक कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

7 MAR 2018 सकाळ

# मनभेद न ठेवणारे डॉ. बाबासाहेब

## प्रा. हरी नरके : इतिहास अधिविभागात दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर, ता. ६ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे त्यांच्या समकालिनांसमवेत वैचारिक मतभेद असले तरी वैयक्तिक मनभेद कधीही बाळगले नाहीत, हे त्यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. आंबेडकर आणि त्यांचे समकालीन (समानता आणि मतभिन्नता - एक अभ्यास) या विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे. या चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात बीजभाषक म्हणून ते बोलत होते. इतिहास अधिविभागाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या मानव्यविद्या विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या.

प्रा. नरके म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब आणि त्यांचे समकालीन असे म्हटले की, सर्वप्रथम त्यांचे आणि महात्मा गांधी यांच्या संबंधांचा विचार पुढे येतो. या दोन्ही व्यक्ती आपापल्या ठिकाणी मोठ्या होत्या. या दोघांच्याही मोठेपणात, दोघांच्याही विकासात त्यांचा परस्परांचा अत्यंत मोलाचा वाटा होता, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. घटना समितीमध्ये बाबासाहेबांना आणण्यासाठी बॅ. जयकरांच्या रिक्त जागेवर त्यांना निवडून आणण्यास गांधींनी सांगितले आणि काँग्रेसने बाबासाहेबांना बिनविरोध निवडून दिले. तत्पूर्वी,




प्रा. हरी नरके.

बाबासाहेबांनी गांधी आणि काँग्रेसने अस्पृश्यांचे काय केले? हा ग्रंथ लिहिल्याने काँग्रेसमध्ये त्यांच्याविषयी नाराजी स्वाभाविक होती. तथापि, घटनासमितीसमोर भाषण करताना बाबासाहेबांनी सर्व सदस्यांना असे आवाहन केले की, आपण सर्वजण कुठल्या ना कुठल्या गटाचे नेते आहोत; पण आता आपण आपले सारे गटतट विसरून एकदिलाने काम करू. बाबासाहेबांच्या या आवाहनाने समस्त काँग्रेसजन चकित झाले होते. त्यांनी बाबासाहेबांच्या भूमिकेचे स्वागत केले.

डॉ. भारती पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. नंदा पारेकर यांनी स्वागत केले. समन्वयक डॉ. अवनिश पाटील यांनी परिचय करून दिला. सह-समन्वयक डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अरुण भोसले, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, प्रा. सुरेश शिपूरकर, प्रा. व्यंकाप्पा भोसले, प्रा. गौतमीपुत्र कांबळे, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. चंद्रकांत कुरणे, डॉ. कविता गगराणी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
7 MAR 2018 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकरांनी वैयक्तिक मनभेद बाळगले नाहीत

## ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे त्यांच्या समकालीनांसमवेत वैचारिक मतभेद होते. मात्र त्यांनी कधीही वैयक्तिक मनभेद कधीही बाळगले नाहीत, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभाग व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'डॉ. आंबेडकर आणि त्यांचे समकालीन 'समानता आणि मतभिन्नता–एक अभ्यास' विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मानव्यविद्या विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या.

प्रा. नरके म्हणाले, अलीकडे छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. आंबेडकर या महापुरूषांचे दैवतीकरण केले जाते. याची चिकित्सा करता येणेही मुश्कील होत आहे. अनुल्लेख आणि अतिदैवतीकरण या दोन्ही बाबी एखाद्या महान व्यक्तीमत्त्वाच्या



कर्तृत्वाविषयी झाकोळ निर्माण करण्यासाठी पुरेशा ठरतात. ऐतिहासिक संशोधनामध्ये पुरावे, दस्ताऐवजांच्या सहाय्याने एखाद्या व्यक्तीच्या कार्याची मोकळेपणाने चिकित्सा करून मांडणी करण्याची गरज आहे. आज नेमक्या त्याच बाबी धोक्यात आल्या आहेत. स्वत: बाबासाहेबांनी चरित्रकार धनंजय कीर यांना आपल्यासारख्या सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या व्यक्तीचे चरित्र लिहीण्यासाठी परवानगी मागण्याची आवश्यकता नसल्याचे कळविले होते. चरित्र लिहील्यानंतर प्रसिद्ध होण्यापूर्वी वाचून दुरुस्ती करणे म्हणजे ती लादलेली सेन्सॉरशीप असेल, असे म्हणून त्यालाही नकार देऊन आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची तयारी दाखविणारे बाबासाहेब हे खरे संशोधक असल्याचे यातून स्पष्ट होते.

बाबासाहेब आणि त्यांचे समकालीन असे म्हटले की, सर्वप्रथम त्यांचे आणि महात्मा गांधी यांच्या संबंधांचा विचार पुढे येतो. त्या काळावर त्यांनी स्वत:ची नाममुद्रा उमटविलेली आहे. घटना समितीमध्ये बाबासाहेबांना आणण्यासाठी बॅ. जयकरांच्या रिक्त जागेवर त्यांना निवडून आणण्यास गांधींजींनी सांगितले आणि काँग्रेसने डॉ. आंबेडकरांना बिनविरोध निवडून दिले, असे प्रा. नरके यांनी सांगितले. पुढे याबाबत त्यांनी काहि तपशीलही दिले.

इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. नंदा पारेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. अवनिश पाटील यांनी परिचय करून दिला. सह–समन्वयक डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, माजी अधिविभाग प्रमुख डॉ. अरुण भोसले, प्रा. सुरेश शिपूरकर, प्रा. व्यंकाप्पा भोसले, प्रा. गौतमीपुत्र कांबळे, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. चंद्रकांत कुरणे, डॉ. कविता गगराणी यांच्यासह अनेक संशोधक, विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 MAR 2018 पुढारी


# वैयक्तिक मनभेद न बाळगणे डॉ. बाबासाहेबांचे वैशिष्ट्य

## - प्रा. हरी नरके

**विद्यापीठात इतिहास अधिविभागातर्फे राष्ट्रीय चर्चासत्र**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे त्यांच्या समकालीनांसमवेत वैचारिक मतभेद असले तरी वैयक्तिक मनभेद कधीही बाळगले नाहीत, हे त्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ इतिहास अधिविभाग व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या वतीने 'डॉ. आंबेडकर आणि त्यांचे समकालीन' (समानता आणि मतभिन्नता-एक अभ्यास) या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. या चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात बीजभाषक म्हणून प्रा. नरके बोलत होते. इतिहास अधिविभागाच्या




**कोल्हापूर : चर्चासत्रात बोलताना प्रा. हरी नरके.**

सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या.

प्रा. नरके यांनी डॉ. आंबेडकर आणि त्यांचे समकालीन असणारे समतुल्य नेते यांच्यातील सहसंबंधांचा अत्यंत व्यापक परिप्रेक्ष्यातून वेध घेतला. ते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या देशाचे महान नेते होते व आहेत. परंतु, अलीकडील काळात छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. आंबेडकर या इतिहास पुरुषांचे इतक्या मोठ्या प्रमाणात दैवतीकरण करण्यात येत आहे की त्यांची चिकित्सा करता येणेही मुश्कील होऊ लागले आहे.

प्रा. नरके पुढे म्हणाले, बाबासाहेब आणि त्यांचे समकालीन असे म्हटले की, सर्वप्रथम त्यांचे आणि महात्मा गांधी यांच्या संबंधांचा विचार पुढे येतो. या दोन्ही व्यक्ती आपापल्या ठिकाणी मोठ्या होत्या. त्या काळावर त्यांनी स्वत:ची नाममुद्रा उमटविलेली आहेच; पण या दोघांच्याही मोठेपणात, दोघांच्याही विकासात त्यांचा परस्परांचा अत्यंत मोलाचा वाटा होता, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. तीच बाब काँग्रेस अर्थात तत्कालीन काँग्रेसचे नेते जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्रप्रसाद आणि मौलाना आझाद यांच्या आंबेडकरांशी असलेल्या संबंधाच्या बाबतीतही होते. घटना समितीमध्ये बाबासाहेबांना आणण्यासाठी बॅ. जयकरांच्या रिक्त जागेवर त्यांना निवडून आणण्यास गांधींनी सांगितले आणि काँग्रेसने बाबासाहेबांना बिनविरोध निवडून दिले. बाबासाहेबांच्या समकालीन संदर्भांचा अभ्यास करीत असताना स्त्री-पुरुष समता, सृजनशील ज्ञाननिर्मिती व कौशल्य विकास, कृतिशील जातीनिर्मूलन, चिकित्सा आणि लोकशाही मूल्यांची जोपासना या पंचसूत्रीचा आधार अभ्यासकांनी घेण्याची आवश्यकता प्रा. नरके यांनी प्रतिपादन केली. यावेळी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदा पारेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. अवनिश पाटील यांनी परिचय करून दिला. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी सूत्रसंचालन केले.

17 MAR 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या विकासातून जीवनात बदल

## लक्ष्मीकांत देशमुख यांचे प्रतिपादन :शिवाजी विद्यापीठात तीन दिवसीय मराठी विज्ञानकथा लेखन कार्यशाळेचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

विज्ञानाने मानवी जीवन प्रभावित केले आहे. विज्ञानाच्या प्रसाराचा वेग आजच्या युगात वाढलेला असून, वैज्ञानिक शोध ही मानवी बुध्दीची प्रतिभा आहे. वैज्ञानिक संशोधनामुळे मानवी जीवन आनंदी व सुखकर बनले आहे. चांगली विज्ञानकथा कल्पनारम्यापेक्षाही तर्काच्या पायावर उभी असते, ती मोडता कामा नये. वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या विकासातूनच जीवनदृष्टीत बदल होईल, असे प्रतिपादन अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग आणि मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या गणित अधिविभागातील रामानुजन सभागृहामध्ये आयोजित तीन दिवसीय मराठी विज्ञानकथा लेखन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र–कुलगुरु डॉ.डी. टी. शिर्के होते.



**कोल्हापूर : मराठी विज्ञान कथा लेखन कार्यशाळेचे उद्घाटन करताना लक्ष्मीकांत देशमुख. सोबत प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह अ. पां. देशपांडे, शिवाजीराव पवार, डॉ. राजन गवस.**

यावेळी देशमुख म्हणाले, नवोदित लेखकांनी विज्ञाननिष्ठ कथा लेखनाचा सातत्याने अभ्यास केला पाहिजे. भारतामध्ये बावीस राजभाषा असून, भाषेचे राजकारण केले जाते. भाषिक गुंतागुंत पहाता विज्ञानाची भाषा वाढण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे. विज्ञान कथेचा विस्तार विविध ज्ञानशाखेस कवेत घेवून समृद्ध झालेला आहे. विज्ञानामुळे मानवी जीवन प्रभावित होते तसे बाधितही होते. याचा अचुक वेध प्रतिभाशाली लेखनामुळे घेणे शक्य होवू शकते. मानवी जीवनाचा आणि विज्ञानाचा शोध फार जवळचा आहे. विज्ञान कथा ही मुलत: माणसाची कथा असते पण ती विज्ञानाच्या पायावर उभी असते. विज्ञान शोधाचा अधार मानवी जीवनास उपकार की अपकार याचा नवोदितांनी अभ्यास करावा. विज्ञानाच्या अभ्यासातून जे प्रश्न निर्माण होतात त्याचा मानवी जीवनावर कसा परिणाम होवू शकतो हे तर्काच्या आधारावर जे जाणतात तेच चांगले विज्ञानकथा लेखक होवू शकतात. आर्थिक, सामाजिक बाजू निर्माण करण्यासाठी विज्ञानाचा उपयोग केला जात आहे.

प्र–कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, नवोदित लेखकांना विज्ञानामधील तंत्रज्ञानाचे मराठीमधून लेखन करण्याची अमाप संधी उपलब्ध आहे. तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन प्रगल्भ होणे गरजेचे आहे. प्रत्येकजण विज्ञाननिष्ठता पाळणारा नागरिक होणे आवश्यक आहे. मुंबई येथील मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाहक अ. पां. देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. मराठी विज्ञानकथा लेखन कार्यशाळेचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, शिवाजीराव पवार, यशवंत देशपांडे, माधुरी शानभाग, स्मिता पोतनीस, शिरीष गोपाळ देशपांडे, सुधा रिसबूड, सतीश बडवे, सखाराम देशमुख, व्यंकाप्पा भोसले, गौतमीपुत्र कांबळे, अनुराधा गुरव आदी उपस्थित होते.

7 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जगण्याचा दृष्टिकोन वैज्ञानिक व्हावा

## लक्ष्मीकांत देशमुख : विद्यापीठात मराठी विज्ञानकथा लेखन कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : जीवनात विज्ञानविषयक दृष्टिकोन तयार होताना जगणे आणि लिहिणे यात अंतर नसावे. जगण्याचा दृष्टिकोन वैज्ञानिक झाला तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलते, असे प्रतिपादन ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या गणित अधिविभागातील रामानुजन सभागृहात आयोजित तीनदिवसीय मराठी विज्ञानकथा लेखन कार्यशाळेच्या उद्‍घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

लक्ष्मीकांत देशमुख म्हणाले, की नवोदित लेखकांनी विज्ञाननिष्ठ कथालेखनाचा सातत्याने अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतात २२ राजभाषा आहेत. हे पाहता विज्ञानाची भाषा वाढली पाहिजे, यासाठी प्रयत्नांची गरज आहे. विज्ञानाने आपले आयुष्य व्यापून गेले आहे. मानवी जीवन प्रभावित करून टाकलेले आहे. विज्ञानाच्या प्रसाराचा वेग आज वाढला आहे. वैज्ञानिक शोध ही मानवी बुद्धीची प्रतिभा आहे. प्रतिभासंपन्न वैज्ञानिक शोधांमुळे मानवी जीवन आनंदी व सुखकर बनले आहे. विज्ञान कथा ही मूलतः माणसाची कथा असते; पण ती विज्ञानाच्या पायावर उभी असते. विज्ञान शोधाचा आधार मानवी जीवनास उपकार



लक्ष्मीकांत देशमुख.

की अपकार, याचा नवोदितांनी अभ्यास करावा. विज्ञान साहित्य, विज्ञान लेखन, विज्ञान कथा निर्माण करून ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोचविले पाहिजे. त्या आधारे माणूस चांगल्या प्रकारे विज्ञाननिष्ठ होऊ शकेल.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, की नवोदित लेखकांना विज्ञानातील तंत्रज्ञानाचे मराठीमधून लेखन करण्याची अमाप संधी उपलब्ध आहे. तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन प्रगल्भ होणे गरजेचे आहे. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मराठी विज्ञानकथा लेखन कार्यशाळेचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. या वेळी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह शिवाजीराव पवार, यशवंत देशपांडे, माधुरी शानभाग, स्मिता पोतनीस, शिरीष गोपाळ देशपांडे, सुधा रिसबूड, सतीश बडवे, सखाराम देशमुख, व्यंकाप्पा भोसले, गौतमीपुत्र कांबळे, अनुराधा गुरव यांच्यासह नवोदित विज्ञानकथा लेखक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
7 MAR 2018 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ...तरच जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलते : देशमुख

## शिवाजी विद्यापीठात मराठी विज्ञानकथा लेखन कार्यशाळेचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जीवनामध्ये विज्ञानविषयक दृष्टिकोन तयार होताना जगणे आणि लिहिणे यामध्ये अंतर नसावे. जगण्याचा दृष्टिकोन वैज्ञानिक झाला तरच जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलते, असे प्रतिपादन ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि मुंबई येथील मराठी विज्ञान परिषद यांच्या वतीने रामानुजन सभागृहामध्ये आयोजित तीन दिवसीय मराठी विज्ञानकथा लेखन कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमात देशमुख बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के होते.

देशमुख म्हणाले, नवोदित लेखकांनी विज्ञाननिष्ठ कथा लेखनाचा सातत्याने अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतामध्ये २२ राजभाषा आहेत. भाषेचे राजकारण आहे. इंग्रजीचा प्रभाव आहे. भाषिक गुंतागुंत आहे. हे पाहता विज्ञानाची भाषा वाढली पाहिजे. यासाठी आवश्यक प्रयत्न होणे गरजेचे आहे. विज्ञानाने आपले आयुष्य व्यापून ठेवलेले आहे. मानवी जीवन प्रभावित करून टाकलेले आहे. प्रतिभासंपन्न वैज्ञानिक शोधांमुळे मानवी जीवन आनंदी व सुखकर बनले आहे.

डॉ. शिर्के म्हणाले, नवोदित लेखकांना विज्ञानामधील तंत्रज्ञानाचे मराठीमधून लेखन करण्याची अमाप संधी उपलब्ध आहे. तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन प्रगल्भ होणे गरजेचे आहे. प्रत्येकजण विज्ञाननिष्ठता पाळणारा एक भारतीय नागरिक होणे आवश्यक आहे.

यावेळी अ.पां.देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे, शिवाजीराव पवार, यशवंत देशपांडे, माधुरी शानभाग, स्मिता पोतनीस, शिरीष देशपांडे आदींसह नवोदित विज्ञानकथा लेखक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

- 17 MAR 2018
जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# सहकार चळवळ विकासाला अग्रक्रम देणारी

## - लक्ष्मीकांत देशमुख



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथील व्याख्यानात बोलताना लक्ष्मीकांत देशमुख.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

सहकार चळवळ ही विकास साध्य करणारी आणि सामाजिक विकासाला अग्रक्रम देणारी आहे. सहकार चळवळ माणसाच्या माणुसकीला आणि नैतिकतेला आवाहन करणारी भारतीय परंपरेला धरून चालणारी व्यापक चळवळ आहे, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागामार्फत सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील व्याख्यानमालेअंतर्गत माजी सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांचे 'सहकारी चळवळीचे भवितव्य' या विषयावरील व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून माजी सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते. तसेच सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते येथील प्राचार्य डॉ. चंद्रकांत कोळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

लक्ष्मीकांत देशमुख म्हणाले, माणसांमधील संघर्ष वाढला तर माणसांचे जीवनक्रम उच्च होऊ शकत नाही; म्हणून माणसांनी एकमेकांना धरुन राहिले पाहिजे, हाच सहकाराचा मूळ गाभा आहे. स्वखुशीची एकजूट हा सहकाराचा मूलमंत्र आहे. अठराव्या शतकामध्ये त्या ठिकाणी खूप गरिबी होती. खऱ्याअर्थाने लोकशाही चळवळीची ती सुरुवात होती. सावकारांपासून सुटका व्हावी म्हणून इंग्रजांनी १९०४ साली सहकारी पतसंस्था कायदा सहमत केला. शेतकऱ्यांना नियमित पतपुरवठा करण्यासाठी एक संस्था उभी करावी म्हणून याचा विचार झाला. २०१४ मध्ये कोल्हापूरमध्ये या चळवळीचा शतक महोत्सव साजरा झाला.

सरकारला बाजूला करून भारतातील ९ राज्यांमध्ये 'म्युच्युअली ऐडेड को-ऑपरेटिव्ह सोसायटी' ॲक्ट हा कायदा कार्यरत झाला आहे. सहकारामधील राजकारण दूर होऊन व्यावसायिक वर्गीकरण आणले पाहिजे. यासाठी खूप परिश्रमपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. सबसिडी आणि राजकारण बंद केले तर सहकारी चळवळ चांगली चालेल.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, जे सगळे होते ते माझ्यासाठी आणि मीं जे करतो तेही माझ्यासाठीच; यामुळे सहकार चळवळीला उतार लागला आहे. तरीही काही सहकारी संस्था चांगले काम करीत आहेत. सहकार चळवळ चांगल्या पद्धतीने चालण्यासाठी आजच्या तरुण पिढीचीही महत्त्वाची जबाबदारी आहे. यावेळी सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्यासमवेत कार्य केलेले बी. डी. पाटील यांनी आपले मनोगत केले. प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले, तर आभार सहायक प्राध्यापक एस. टी. कोंबडे यांनी मानले. प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

17 MAR 2018 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सहकारी चळवळ सामाजिक विकासाला अग्रक्रम देणारी'

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**खासगी क्षेत्राप्रमाणे** अमर्याद नफा कमावणारी सहकार चळवळ संपूर्ण देशाने स्वीकारली पाहिजे, त्यासाठी मोठे धोरण आखले पाहिजे. सहकारी चळवळ ही विकास साध्य करणारी आणि सामाजिक विकासाला आग्रक्रम देणारी आहे, असे मत माजी सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी येथे सोमवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागामार्फत सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व्याख्यानमालेअंतर्गत देशमुख यांचे 'सहकारी चळवळीचे भवितव्य' या विषयावरील व्याख्यान आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते. तसेच, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यलय, नातेपुते येथील प्राचार्य डॉ.चंद्रकांत कोळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

देशमुख म्हणाले, माणसांनी एकमेकांना धरून राहिले पाहिजे, हाच सहकाराचा मूळ गाभा आहे. सावकारांपासून सुटका व्हावी म्हणून इंग्रजांनी १९०४ साली सहकारी पतसंस्था कायदा सहमत केला. शेतकऱ्यांना नियमित पतपुरवठा करण्यासाठी एक संस्था उभी करावी म्हणून याचा विचार झाला. सहकारी चळवळीच्या माध्यमातून गुजरातच्या 'अमूल'ने देशामध्ये फार मोठी प्रगती साध्य केली आहे.

**सहकार भ्रष्टाचाराचे केंद्र**

सहकारातील अवगुणांकडे लक्ष वेधत ते म्हणाले, सहकारामध्ये, पैशाचे मूल्य वाढत गेले आणि माणसाचे मूल्य कमी होत गेले. अशा वेळेस सहकारामध्ये भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात होत गेला. गेल्या दहा वर्षांमध्ये ३५ सहकारी साखर कारखाने विकले गेले. सहकारामध्ये राजकारण शिरले आणि भ्रष्टाचाराचे केंद्र बनले. त्यामुळे निम्मे कारखाने बंद पडले. अशा वेळेस खासगीकरण उदयास आले. राज्याने सहकार चळवळीच्या माध्यमातून खूप मोठी प्रगती साधलेली आहे. आता, तीच बदनाम झालेली आहे. राज्यातील सहकाराची अवस्था वेळीच सुधारली पाहिजे. प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस.कांबळे यांनी केले. प्रा. एस. टी. कोंबडे यांनी आभार व्यक्त केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# 'सहकार चळवळीने विकासाला दिशा'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

सहकारी चळवळ ही विकासाला योग्य दिशा देणारी आणि सामाजिक विकासाला आग्रक्रम देणारी आहे. सहकारी चळवळ माणुसकीला आणि नैतिकतेला आवाहन करणारी, भारतीय परंपरेला धरुन चालणारी व्यापक चळवळ आहे,' असे मत मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागामार्फत सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व्याख्यानमाले अंतर्गत 'सहकार चळवळीचे भवितव्य,' या विषयावरील व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ.डी. टी.शिर्के होते.

माणसांमधील संघर्ष वाढला तर माणसांचे जीवन उन्नत होऊ शकत नाही, असे सांगून देशामुख म्हणाले, 'माणसांनी एकमेकांना धरुन राहिले पाहिजे, हाच सहकाराचा मूळ गाभा आहे. स्वखुशीची एकजूट हा सहकाराचा मूलमंत्र आहे. एकमेकांना मदत करणारी ही सहकारी चळवळ आहे. सहकारी चळवळीचा पाया हा नैतिकतेवर आधारित असला प्राहिजे, खासगी क्षेत्राप्रमाणे अमर्याद नफा कमावणारे हे क्षेत्र न होता सहकार चळवळ संपूर्ण देशाने स्वीकारली पाहिजे. त्यासाठी धोरण आखावे लागेल.

शंकरराव मोहित पाटील यांचे सहकारी बी. डी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

7 MAR 2018 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सकारात्मकतेने पाहिल्यास संधीची जाणीव : लोखंडे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भोवतालच्या बदलांकडे सकारात्मकतेने पाहिल्यास नोकरी, व्यवसायाच्या संधीची जाणीव होईल, असे प्रतिपादन पुणे येथील ग्रामीण संबंध संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप लोखंडे शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर करिअर गाईडन्स अँड सायकॉलॉजिकल कौन्सिलिंगतर्फे विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात पुणे येथील ग्रामीण संबंध संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप लोखंडे यांचे 'चेंजिंग रुरल इंडिया करिअर अपॉर्च्युनिटीज फॉर स्टुडंटस् ऑफ हायर एज्युकेशन' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाणिज्य अधिविभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते.

प्रदीप लोखंडे म्हणाले, भारतामध्ये सकारात्मक बदलांसाठी मोठी ताकद आहे. त्यामुळे सर्व जगाचे लक्ष भारताकडे लागलेली आहे. सध्या भारतामध्ये माहिती तंत्रज्ञान, शिक्षण क्षेत्र, व्यापार तसेच शासन व्यवस्था या बाबींमध्ये अनेक बदल घडून येत आहेत. विशेषतः ग्रामीण भागांमधील बदल लक्षात घेतल्यास तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असल्याचे दिसून येतील. तरुणांनी स्वतःच्या विचारांमधील नकारात्मकता काढून टाकल्यास त्यांना या संधींची जाणीव होईल. व्यवसायासाठी कोठेही जाऊन काम करण्याची मानसिकता हवी. तसेच कामामध्ये धोका पत्करण्याचे धैर्य हवे. जिथे जाल त्या ठिकाणची भाषा संस्कृती शिकून घेतली पाहिजे. स्वतःकडे ग्लोबल सिटीझन म्हणून पाहिल्यास दृष्टी व्यापक होईल. स्वतःच्या विकासाबरोबरच इतरांच्या विकासाचाही विचार करा. आई-वडिलांनी आपल्यासाठी केलेले कष्ट लक्षात ठेवा. आपल्या प्रगतीमुळे आई-वडिलांच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसणार आहे त्याचा विचार करा. वाचनाने



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर करिअर गाईडन्स अँड सायकॉलॉजिकल कौन्सिलिंगतर्फे विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात 'चेंजिंग रुरल इंडिया करिअर अपॉर्च्युनिटीज फॉर स्टुडंटस् ऑफ हायर एज्युकेशन' या विषयावर बोलताना पुणे येथील ग्रामीण संबंध संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप लोखंडे.**

आयुष्याची समज वाढेल म्हणून भरपूर वाचन करा. जगामध्ये जे चांगले बदल घडत आहेत त्यांचा स्वीकार करा व नकारात्मकात काढन टाका. मी, वाई तालुक्यातील एका खेड्यामध्ये वाढलो. अत्यंत गरीब परिस्थितीमध्ये शिक्षण घेऊन आज जगातील २९ देशांमध्ये फिरून मी कार्य करीत आहे आणि माझे ज्ञान वाढवून घेतले आहे. भारतातील विविध क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग आशादायक आहे. महिला त्यांच्या सामर्थ्याने देशामध्ये बदल घडवू शकतात.

अध्यक्षस्थानावरून वाणिज्य अधिविभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव म्हणाले, विद्यार्थी हे संकल्पनांचे विक्रेते झाले पाहिजेत. त्यांनी प्रगल्भतेने विचार करायला शिकले पाहिजेत. नियमितपणे वाचन, सकारात्मक विचार हे यशस्वी होण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. प्रास्ताविक व स्वागत केंद्राच्या समन्वयक डॉ. जी. एस. पाटील यांनी केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले. यावेळी विविध अधिविभागातील प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

7 MAR 2018

सकाळ

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ६ : विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रात शुक्रवारी (ता. ९) सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेत २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी मुलाखत तंत्र कार्यशाळेचे आयोजन केले आहे. संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी ही माहिती दिली. उच्चशिक्षणापासून वंचित असणाऱ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे व शिक्षण प्रवाहात असणाऱ्यांना अधिक गतिमान करणे या दृष्टीने दूरशिक्षण केंद्र अखंड कार्यरत आहे. विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रात होणाऱ्या कार्यशाळेत उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, श्री. एस. एम. कुबल, कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे व सहायक कुलसचिव ए. जे. काटकर आदी मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेस विद्यापीठ संकेतस्थळ www.unishivaji.ac.in येथे Workshop/Seminar/Conference Registration या लिंकवर ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य असून, प्रवेशशुल्क आकारले जाणार नाही. अधिक माहितीसाठी समन्वयक डॉ. नितीन रणदिवे व डॉ. सी. ए. बंडगर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू
7 MAR 2018
पुढारी

# विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्रात शुक्रवारी कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्रात शैक्षणिक वर्षातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी शुक्रवारी ९ मार्च रोजी मुलाखत तंत्र या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबतची माहिती संचालक प्रा.डॉ. एम. ए. अनुसे यांनी प्रसिध्दीस दिली आहे. दूर शिक्षण केंद्रात सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेत होणाऱ्या कार्यशाळेत उपकुलसचिव डॉ व्ही. एन. शिंदे, एस. एम. कुबल, डॉ. एन. पी. सोनजे व सहाय्यक कुलसचिव ए. जे. काटकर आदी मार्गदर्शन करणार आहेत.